श्री सद्‌गुरू

साईनाथ – सगुणोपासना

(श्री. कै. कृ. जा. भीष्म)



प्रकाशक :

द. म. सुकथनकर

अध्यक्ष,

श्री साईबाबा संस्थान, शिरडी

मुद्रक :

न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस

वडाळा उद्योग भवन,

मुंबई - ४०० ०३१.

सर्व हक्क संस्थानच्या स्वाधीन

आवृत्ती : ४१ वी

सन : २००० मूल्य : रु. २.०० प्रती : १,००,०००

श्री साईलीलेच्या प्रथम अंकावरून संपादित.

श्री साईसगुणोपासनेची जन्मकथा

वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री जागेश्वर भीष्म नागपूर जिल्ह्यातील बोरी या गावी वास्तव्य करीत असत व शेतीवाडी करून आपला निर्वाह चालवीत. त्यांच्या पत्नी निवर्तल्यावर त्यांचे चित्त अस्थिर झाले. त्यांच्या इष्टमित्रांनी त्यांना पुनर्विवाह करण्याचा सल्ला दिला; पण त्यांना तो रुचला नाही. शके १८३०, श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस रात्रौ त्यांना एक स्वप्न पडले : एक काळ्या वर्णाचा पुरुष त्यांना दिसला. त्याच्या अंगास केशरी रंगाची उटी लागली होती, कपाळास त्रिपुंड्र होते व पादुकांचीही गंधपुष्पाने पूजा झाली होती. त्याने भीष्मांच्या हाती एक वर्तमानपत्र दिले. भीष्मांनी त्याला विचारले, तू कोण व तुझे नाव काय ? तेव्हा त्याने संभाषण न करता त्या वर्तमानपत्राकडे बोट दाखविले. भीष्मांनी वर्तमानपत्राकडे नजर टाकताच त्यांना 'सच्चिदानंद' ही ठळक अक्षरे दिसली. तितक्यात त्या पुरुषाने "वाचा", अशी भीष्मांना आज्ञा केली. तेव्हा पुन: त्या वर्तमानपत्राकडे पाहू लागता "मंत्र व शिकावा", असे एके जागी लिहिले होते. हे काय, याचा अर्थ वगैरे प्रश्न करण्याचा भीष्म विचार करतात तो, तो पुरुष नाही व वर्तमानपत्रही नाही. ते विस्मित झाले. इतक्यात त्यांच्या मित्राने दार ठोठावले व त्याबरोबर त्यांना जाग आली. ताबडतोब हे स्वप्न त्यांनी आपल्या रोजनिशीत लिहून ठेवले. पण या स्वप्नाचे कोडे काहीकेल्या त्यांना उमजेना. काही दिवसांनी तेथे एक गाणपत्य साधु आले. त्यांना हे स्वप्न सांगितल्यावर "सच्चिदानंद स्वामी तुमचे गुरु आहेत", असे

म्हणून त्यांना ''वशीकावा'' हा मंत्र दिला.

काही दिवसांनी भीष्म उमरावतीस गेले असता दादासाहेब खापर्ड्यांनी ''शिरडीस चलता काय ?'' असा त्यांना प्रश्न केला. भीष्मांनी रुकार दिला व खापर्ड्यांच्यासमवेत ते शिरडीस गेले. शिरडीस पोचताच भीष्मांनी साईबाबांचे दर्शन घेतले व त्यांना नमस्कार केला. बाबांनी हात जोडले व ''जय सच्चिदानंद'', असे तोंडाने म्हणाले तेव्हा भीष्म घोटाळ्यात पडले. स्वप्नात दिसलेले सच्चिदानंद व हे - एक की दोन ? एक म्हणावे, तर स्वप्नातील साधु वैष्णव होते व साईबाबा तर यवन दिसतात. दोन म्हणावे, तर बाबांनी आपल्याला पाहिल्याबरोबर सच्चिदानंदाचे नाव का घेतले ? अशा विचारात ते पडले. तेथे सर्व हिंदु, ब्राह्मणसुद्धा बाबांचे चरणोदक घेत असत, पण भीष्मांनी ते घेतले नाही. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत. भीष्म बाबांच्या जवळ बसले असले तरी बाबांनी त्यांना सुरुवातीस चिलीम ओढण्यास दिली नाही. पण एक दिवस बाबांच्या गोष्टी चालल्या असता एका सेवकाने चिलीम भरली व बाबांच्या हाती दिली. बाबांनी ती नुसती तोंडास लावली व जवळ बसलेल्या भीष्मांना देऊन ''पी'', असे म्हणाले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे भीष्म चिलीम प्याले व बाबांच्या हाती परत दिली. बाबांनी ती घेतली व तोंडाने ''आपण सगळीकडे फिरतो, गड्या. मुंबई, पुणे, सातारा, नागपूर ही सगळी शहरे रामाने भरली आहेत'', असे बोलून ते भीष्मांना एकदम म्हणाले, ''तू लाडू एकटा एकटाच खातोस, आम्हास एकही देत नाहीस. आतातरी तू मला पाच लाडू दे!'' बाबा प्रत्येक भक्ताकडे दक्षिणा मागत व त्याचा विनियोग ते परोपकारासाठी करीत, हे सर्व साईभक्तांस विदित आहेच.

बाबांच्या या वाक्यांनी भीष्मांच्या मनावर निराळाच परिणाम झाला.

स्वप्नात दिसलेलं सच्चिदानंद वेगळे व साईनाथ वेगळे ही भावना तात्काळ मावळली (तीर्थ वाटणाऱ्याकडून त्यांनी बुध्या तीर्थ मागून घेतले) व बाबांच्या पायावर डोके ठेवले. त्यावेळेस बाबांनी आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर दोन मिनिटे ठेविला. तेव्हा त्यांच्या मनाची स्थिति देवनाथांच्या खालील पदांत वर्णिल्याप्रमाणे "मेरा मैं जानूं" अशी झाली.

गुरुकृपे का अंजन पाया मेरा मैं जानूं ।
आपरूप नयनों में छाया मेरा मैं जानूं ।।ध्रु.।।
उलट मार्ग की राह बतायी मेरा मैं जानूं ।
बुरे करम की रेख मिटाई मेरा मैं जानूं ।।१।।
चांदसुरज बिन परा उजाला मेरा मैं जानूं ।
पिलाया अजरामर का प्याला मेरा मैं जानूं ।।२।।
जहां तहां मैं आप अकेला मेरा मैं जानूं ।
आप ही गुरू और आप ही चेला मेरा मैं जानूं ।।३।।
गोविंदनाथ ने यही बतलाया मेरा मैं जानूं ।
देवनाथ अपने में मिलाया मेरा मैं जानूं ।।४।।

नंतर भीष्म बिऱ्हाडी गेले. पण या परस्थळी आपण लाडू कसे करणार याची त्यांना चिंता लागली. केले तरी दुसऱ्याच्या मदतीने आणि बाबा ते ओळखणारच. शिवाय पाचच लाडू का मागितले ? नुसते लाडूच का मागितले नाही ? असा मनाशी विचार करीत त्यांनी दिवस घालविला. रात्री त्याच चिंतनात त्यांना झोप लागली. पण लवकरच ती उघडली व एक श्लोक करण्याची त्यांना स्फूर्ति झाली. लागलीच श्लोक तयार झाला. सकाळी त्याच्यापुढचा श्लोक करीत बसले असता काकासाहेब दीक्षितांनी बाबांकडे जाताना वाटेत

तो श्लोक पाहिला. काही वेळाने स्नान करून भीष्मही बाबांच्या दर्शनास गेले. गेल्याबरोबर बाबांनी भीष्मांना लाडवांची आठवण करून दिली. भीष्म काही बोलले नाहीत, तरी दीक्षित म्हणाले, "लाडू तयार होऊन राहिले आहेत". हे ऐकताच महाराज स्वस्थ बसले. दुसऱ्या दिवशी भीष्मांनी पाच श्लोक तयार केले व नंतर डोके बरेच चालविले, परंतु पाचांपेक्षा अधिक श्लोक त्यांना स्फुरले नाहीत. बाबांच्या हातात पाच श्लोकांचा कागद दिल्यावर त्यांनी तो पाहून भीष्मांस वाचावयास आज्ञा केली. ते श्लोक वाचीत असता पुन: बाबांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. त्यावेळेस त्यांच्या मनाची जी स्थिति झाली ती अवर्णनीय होती. त्यानंतर प्रत्येक कविता तयार करावी व बाबांना दाखवावी आणि त्यांच्या आज्ञेने वाचून दाखवावी, असा क्रम सुरू झाला व **'श्री साईनाथ-सगुणोपासना'** नावाची पुस्तिका तयार होऊन **'श्रीसाईचरणी'** अर्पण झाली.

श्री साईनाथ-सगुणोपासनेची पुस्तके १९२२ पर्यंत नामदार गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे स्वखर्चाने छापवीत असत. 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या धर्मादाय संस्थेची स्थापना झाल्यानंतर संस्थानच्या कार्यकारी मंडळाने भीष्मांच्या संमतीने पुस्तिकेची नवीन आवृत्ती प्रकाशित करायचे ठरविले व मूळ पुस्तिकेत काही अधिक पदांची भर घालून नवी आवृत्ती प्रकाशित केली.

अशी आहे श्री साईनाथ सगुणोपासनेच्या जन्माची सुरस कथा.

- प्रकाशक

श्रीसद्गुरुसाईनाथचरणारविंदीं

अर्पण केलें असे.

\- पुस्तककर्ता

गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकं
प्रादुर्भूत्वाऽऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधि[1]क्षेत्रधाम्नि ।
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन् साईनाथः ।।१।।

पाठभेद - १. 'शिरडी' हा शब्द 'शिलधी' या शब्दाचा अपभ्रंश आहे.

भाग १ ला

कांकड आरती, पहाटे पाच वाजता

श्रीसद्गुरु

साईनाथ-सगुणोपासना

प्रात:काळचा उपासनाक्रम

(१) भूपाळी

जोडुनियां कर चरणीं ठेविला माथा । परिसावी विनंती माझी सद्गुरुनाथा ।।१।। असो नसो भाव आलों तुझिया ठाया । कृपादृष्टीं पाहें मजकडे सद्गुरुराया ।।२।। अखंडित असावें ऐसें वाटतें पायीं । सांडूनी संकोच ठाव थोडासा देईं ।।३।। तुका म्हणे देवा माझी वेडीवांकुडी । नामें भवपाश हातीं आपुल्या तोडी ।।४।।

(२) भूपाळी

उठा पांडुरंगा आतां प्रभातसमयो पातला । वैष्णवांचा मेळा गरुडपारीं दाटला ।।१।। गरुडपारापासुनी महाद्वारापर्यंत । सुरवरांची मांदी उभी जोडुनियां हात ।।२।। शुकसनकादिक नारद-तुंबर भक्तांच्या कोटी। त्रिशूल डमरू घेउनि उभा गिरिजेचा पती ।।३।। कलीयुगींचा भक्त नामा उभा कीर्तनीं । पाठीमागें उभी डोळा लावुनियां जनी ।।४।।

पाठभेद - १. पंढरीनाथा

(३) भूपाळी

(चाल - घन:श्यामसुंदरा श्रीधरा०)

उठा उठा श्रीसाइनाथ गुरु चरणकमल दावा । आधिव्याधि भवताप वारुनी तारा जडजीवा ।।ध्रु०।। गेली तुम्हां सोडूनियां भवतमरजनी विलया । परि ही अज्ञानासी तुमची भुलवि योगमाया । शक्ति न आम्हां यत्किंचितही तिजला साराया । तुम्हीच तीतें सारुनि दावा मुख जन ताराया ।।चा०।। भो साइनाथ महाराज भवतिमिरनाशक रवी । अज्ञानी आम्ही किती तव वर्णावी थोरवी । ती वर्णितां भागले बहुवदनि शेष विधि कवी ।।चा०।। सकृप होउनि महिमा तुमचा तुम्हीच वदवावा ।।आधि०।।उठा०।।१।। भक्त मनीं सद्भाव धरुनि जे तुम्हां अनुसरले । ध्यायास्तव ते दर्शन तुमचें द्वारिं उभे ठेले । ध्यानस्था तुम्हांस पाहुनी मन अमुचें धालें । परि त्वद्वचनामृत प्राशायातें आतुर झालें ।।चा०।। उघडूनी नेत्रकमला दीनबंधु रमाकांता । पाहिं बा कृपादृष्टीं बालका जशी माता । रंजवी मधुरवाणी हरीं ताप साइनाथ ।।चा०।। आम्हीच अपुले काजास्तव तुज कष्टवितों देवा । सहन करिशील तें ऐकुनी द्यावी भेट कृष्ण धांवा ।।उठा उठा०।। आधिव्याधि०।।२।।

(४) भूपाळी

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां । झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा ॥१॥ संत साधू मुनी अवघे झालेती गोळा । सोडा शेजे सुख आतां बघुं द्या मुखकमळा ॥२॥ रंगमंडपी महाद्वारीं झालीसे दाटी । मन उतावीळ रूप पहावया दृष्टी ॥३॥ राही रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया । शेजे हालवुनी जागें करा देवराया ॥४॥ गरुड हनुमंत उभे पाहती वाट । स्वर्गींचे सुरवर घेउनि आले बोभाट ॥५॥ झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा । विष्णुदास नामा उभा घेऊनि कांकडा ॥६॥

(५) अभंग

घेउनियां पंचारती । करूं बाबांसी आरती ॥ करूं साईसी० ॥१॥ उठा उठा हो बांधव । ओंवाळूं हा रमाधव ॥ साई र०॥ओं०॥२॥ करूनीयां स्थीर मन । पाहूं गंभीर हें ध्यान ॥ साईंचें हें० ॥पा०॥३॥ कृष्णानाथा दत्तसाई । जडो चित्त तुझे पायीं ॥साई तु०॥जडो०॥४॥

(६) कांकड आरती

कांकड आरती करीतों साइनाथ देवा । चिन्मयरूप दाखवीं घेउनि बालक-लघुसेवा ॥ध्रु०॥ काम क्रोध मद मत्सर आटुनी कांकडा केला । वैराग्याचे तूप घालुनी मी तो भिजविला ।

साइनाथगुरुभक्तिज्वलनें तो मी पेटविला । तद्वृत्ती जाळुनी गुरूनें प्रकाश पाडिला । द्वैत-तमा नासूनी मिळवी तत्स्वरूपीं जीवा ।।चि०।।१।। भू-खेचर व्यापूनी अवघे हृत्कमलीं राहसी । तोचि दत्तदेव तू शिरडी राहुनी पावसी[1]। राहुनी येथे अन्यत्रहि तू भक्तांस्तव धांवसी । निरसुनियां संकटा दासा अनुभव दाविसी । न कळे त्वल्लीलाही कोण्या देवा वा मानवा ।।चि०।।२।। त्वद्यशदुंदुभीनें सारें अंबर हें कोंदलें । सगुण मूर्ति पाहण्या आतुर जन शिरडी आले । प्राशुनी त्वद्वचनामृत अमुचे देहभान हरपलें । सोडूनियां दुरभिमान मानस त्वच्चरणीं वाहिले । कृपा करुनियां साइमाउले[2] दास पदरिं घ्यावा ।।चि०।।कां०चि०।।३।।

(७) कांकड आरती

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओवाळूं आरती ।।१।। ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेविला माथा ।।ध्रु०।। काय महिमा वर्णूं आतां सांगणे किती । कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ।।२।। राई रखुमाबाई उभ्या दोघी दो बाहीं । मयूरपिच्छ चामरें ढाळिति ठायींचे ठायीं ।।३।। तुका म्हणे दीप घेउनि उन्मनीत शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ।।४।। ओवाळूं०।।

पाठभेद - १. कृष्ण माउले २. साईनाथा

(८) पद (उठा उठा)

उठा साधुसंत साधा आपुलालें हित । जाईल जाईल हा नरदेह मग कैंचा भगवंत ।।१।। उठोनियां पहांटे बाबा उभा असे विटे । चरण तयांचे गोमटे अमृतदृष्टी अवलोका ।।२।। उठा उठा हो वेगेंसीं चला जाऊंया राउळासी । जळतील पातकांच्या राशी कांकड आरती देखिलिया ।।३।। जागें करा रुक्मिणीवर, देव आहे निजसुरांत । वेगें लिंबलोण करा दृष्ट होईल तयासी ।।४।। दारीं वाजंत्रीं वाजती ढोल दमामे गर्जती । होते कांकड आरती माझ्या सद्‌गुरुरायांची ।।५।। सिंहनाद शंखभेरी आनंद होतो महाद्वारीं । केशवराज विटेवरी नामा चरण वंदितो ।।६।।

भजन

साईनाथगुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।
दत्तराज गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय ।

(९) श्री साईनाथप्रभाताष्टक

(पृथ्वी)

प्रभातसमयीं नभा शुभ रविप्रभा फांकली ।
स्मरे गुरु सदा अशा समयिं त्या छळे ना कली ।।

म्हणोनि कर जोडूनी करुं अतां गुरुप्रार्थना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥१॥
तमा निरसि भानु हा गुरुहि नासि अज्ञानता ।
परंतु गुरुची करी न रविही कधीं साम्यता ॥
पुन्हां तिमिर जन्म घे गुरुकृपेनि अज्ञान ना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥२॥
रवि प्रगट होउनि त्वरित घालवी आलसा ।
तसा गुरुहि सोडवी सकल दुष्कृतीलालसा ॥
हरोनि अभिमानही जडवि तत्पदीं भावना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥३॥
गुरूसि उपमा दिसे विधिहरीहरांची उणी ।
कुठोनि मग येई ती कवनिं या उगी पाहुणी ॥
तुझीच उपमा तुला बरवि शोभते सज्जना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥४॥
समाधि उतरोनियां गुरु चला मशिदीकडे ।
त्वदीय वचनोक्ति ती मधुर वारिती सांकडें ॥
अजातरिपु सद्गुरो अखिलपातका भंजना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥५॥
अहा सुसमयासि या गुरु उठोनियां बैसले ।
विलोकुनि पदाश्रिता तदिय आपदे नासिलें ॥
असा सुहितकारि या जगतिं कोणिही अन्य ना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥६॥

असे बहुत शाहणा परि न ज्या गुरूची कृपा ।
न तत्स्वहित त्या कळे करितसे रिकाम्या गपा ॥
जरी गुरुपदा धरी सुदृढ भक्तिनें तो मना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥७॥
गुरो विनंति मी करीं हृदयमंदिरीं या बसा ।
समस्त जग हें गुरुस्वरूपची ठसो मानसा ॥
करो सतत सत्कृती मतिहि दे जगत्पावना ।
समर्थ गुरु साइनाथ पुरवी मनोवासना ॥८॥

स्त्रग्धरा

प्रेमें या अष्टकासी पढुनि गुरुवरा प्रार्थिती जे प्रभातीं ।
त्यांचे चित्तासि देतों अखिल हरुनियां भ्रांति मी नित्य शांती ॥
ऐसें हें साइनाथें कथुनि सुचविलें जेविं या बालकासी ।
तेवीं त्या कृष्णपायीं नमुनि सविनयें अर्पितों अष्टकासी ॥९॥

(१०) पद

साई रहम नजर करना, बच्चों का पालन करना ॥ध्रु०॥
जाना तुमने जगत्पसारा, सबही झूठ जमाना ॥साइ०॥१॥
मैं अंधा हूँ बंदा आपका, मुझको प्रभु दिखलाना ॥साइ०॥२॥
दास गनू कहे अब क्या बोलूं, थक गई मेरी रसना ॥साइ०॥३॥

(११) पद

रहम नजर करो, अब मोरे साईं, तुमबिन नहीं मुझे

मां-बापभाई ।।ध्रु०।। मैं अंधा हूं बंदा तुम्हारा । मैं ना जानूं, अल्लाइलाही ।।रहम०।।१।। खाली जमाना मैंने गमाया । साथी आख़िर का किया न कोई ।।रहम०।।२।। अपने मशीद का झाडू गनू है । मालिक हमारे, तुम बाबा साईं ।।रहम०।।३।।

(१२) पद

तुज काय देऊं सावळ्या मी खाया तरी
मी दुबळी बटिक नाम्याची जाण श्रीहरी ।
उच्छिष्ट तुला देणें ही गोष्ट ना बरी
तूं जगन्नाथ, तुज देऊं कशी रे भाकरी ।
नको अंत मदीय पाहूं सख्या भगवंता । श्रीकांता ।
माध्यान्हरात्र उलटोनि गेली ही आतां । आण चित्ता ।
होईल तुझा रे कांकडा कीं राउळांतरीं ।
आणतील भक्त नैवेद्यहि नानापरी ।।

(१३) पद

श्रीसद्गुरु बाबासाई तुजवांचुनि आश्रय नाहीं, भूतलीं ।।ध्रु०।। मी पापी पतित धीमंदा । तारणें मला गुरुनाथा, झडकरी ।।१।। तूं शांतिक्षमेचा मेरू । तूं भवार्णवींचें तारूं, गुरुवरा ।।२।। गुरुवरा मजसि पामरा, अतां उद्धरा, त्वरित लवलाही, त्वरित लवलाहीं, मी बुडतों भवभय डोहीं उद्धरा ।।श्रीसद्गु०।।३।।

- कांकड आरतीचा कार्यक्रम समाप्त -

भाग २ रा

माध्यान्ह आरती, दुपारी १२ वाजता

(१) अभंग

घेउनियां पंचारती । करूं बाबांसी आरती । करूं साईसी० ॥१॥ उठा उठा हो बांधव । ओंवाळूं हा रमाधव ॥ साई र०॥ओं०॥२॥ करूनियां स्थिर मन । पाहूं गंभीर हें ध्यान ॥ साईचें हें०॥पा०॥३॥ कृष्णनाथा दत्तसाई । जडो चित्त तुझे पायीं ॥ साई तु०॥जडो०॥४॥

(२) आरती

आरती साईबाबा । सौख्यदातार जीवा । चरणरजातलीं । द्यावा दासां विसांवा, भक्तां विसांवा ॥आ.ध्रु.॥ जाळुनियां अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षुजनां दावी । निज डोळां श्रीरंग ॥आ०॥१॥ जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी ही माव ॥आ०॥२॥ तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा ॥आ०॥३॥ कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥द०॥आ०॥४॥ आठां दिवसां गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया । भवभय निवारी ॥आ०॥५॥ माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरजसेवा मागणें हेंचि आतां । तुम्हां देवाधिदेवा ॥आ०॥६॥ इच्छित दीन चातक । निर्मल तोय निज सुख । पाजावें माधवा या । सांभाळ निज आपुली भाक ॥आ०॥७॥

(२) (अ) आरती

जय देव जय देव दत्ता अवधूता । साई अवधूता । जोडुनि कर तव चरणीं ठेवितों माथा । जय देव जय देव ।।ध्रु०।। अवतरसी तूं येतां धर्मातें ग्लानी । नास्तिकांनाही तू लाविसि निजभजनीं । दाविसि नाना लीला असंख्य रूपांनीं । हरिसी दीनांचें तू संकट दिनरजनी ।।ज०।।१।। यवनस्वरूपीं एक्या दर्शन त्वां दिधलें । संशय निरसुनियां तद्द्वैता घालविलें । गोपीचंदा मंदा त्वांची उद्धरिलें । मोमिन वंशीं जन्मुनि लोकां तारियलें ।।ज०।।२।। भेद न तत्त्वीं हिंदूयवनांचा कांहीं । दावायासी झाला पुनरपि नरदेही । पाहसि प्रेमानें तू हिंदू-यवनांही । दाविसि आत्मत्वाने व्यापक हा साई ।।ज०।।३।। देवा साईनाथा त्वत्पदनत व्हावें । परमायामोहित जनमोचन झणिं व्हावें । त्वत्कृपया सकलांचें संकट निरसावें । देशिल तरि दे त्वद्यश कृष्णानें गावें ।।ज०।।४।।

(३) अभंग

शिरडी माझें पंढरपुर । साईबाबा रमावर ।।१।।
शुद्ध भक्ती चंद्रभागा । भाव पुंडलीक जागा ।।२।।
या हो या हो अवघे जन । करा बाबांसी वंदन ।।३।।
गणू म्हणे बाबा साई । धांव पाव माझे आई ।।४।।

(४) नमन

घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ।। प्रेमें आलिंगिन, आनंदें पूजिन, भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।। त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामि ।।३।। अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्र भजे ।।४।।

(५) नामस्मरण

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे (इति त्रिवार)

(६) पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्या संति देवाः ।। ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कूर्महे । स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो दधातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै

समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

(७) नमस्काराष्टक

अनंता तुला तें कसें रे स्तवावें । अनंता तुला तें कसें रे नमावें ॥ अनंत मुखांचा शिणे शेष गातां । नमस्कार साष्टांग श्रीसाइनाथा ॥१॥ स्मरावें मनीं त्वत्पदां नित्य भावें । उरावें तरी भक्तिसाठीं स्वभावें ॥ तरावें जगा तारुनी मायताता । नमस्कार०॥२॥ वसे जो सदा दावया संतलीला । दिसे अज्ञ लोकांपरी जो जनांला ॥ परी अंतरीं ज्ञान कैवल्यदाता । नमस्कार०॥३॥ बरा लाधला जन्म हा मानवाचा । नरा सार्थका साधनीभूत साचा ॥ धरूं साइप्रेमा गळाया अहंता । नमस्कार०॥४॥ धरावें करीं सान अल्पज्ञ बाला । करावें अम्हां धन्य चुंबोनि गाला ॥ मुखीं घाल प्रेमें खरा ग्रास आतां । नमस्कार०॥५॥ सुरादीक ज्यांच्या पदा वंदिताती । शुकादीक ज्यांतें समानत्व देती ॥ प्रयागादि तीर्थें पदीं नम्र होतां । नमस्कार०॥६॥ तुझ्या ज्या पदा पाहतां गोपबाली । सदा रंगली चित्स्वरूपीं मिळाली ॥ करी रासक्रीडा सवें कृष्णनाथा ।

पाठभेद - १. मुखीचा २. शिणी ३. जनीं ४. कीर्तिरूपें ५. जगीं ६. सदा जो निजेला ७. सार्थक साधना तो फुकाचा ८. पदीं नम्रता ये प्रयागादीतीर्था ९. त्या

नमस्कार०॥७॥ तुला मागतों मागणें एक द्यावें । करा[1] जोडितों दीन अत्यंत भावें ॥ भवीं मोहनीराज हा[2] तारिं आतां । नमस्कार साष्टांग श्रीसाइनाथा ॥८॥

(८) प्रार्थना

ऐसा येईं[3] बा । साई दिगंबरा । अक्षयरूप अवतारा । सर्वहि व्यापक तूं । श्रुतिसारा । अनुसयाऽत्रिकुमारा[4] ॥ध्रु०॥ काशी स्नान जप, प्रतिदिवशीं । कोल्हापुर भिक्षेसी । निर्मल नदि तुंगा, जल प्राशी । निद्रा माहुर देशीं ॥ऐ०॥१॥ झोळी लोंबतसे वाम करीं । त्रिशूल[5]-डमरू[6]-धारी । भक्तां[7] वरद सदा सुखकारी । देशील[8] मुक्ती चारी ॥ऐ०॥२॥ पायीं पादुका जपमाला[9] कमंडलू मृगछाला । धारण करिशी बा[10] । नागजटा मुगुट शोभतो[11] माथां ॥ऐ०॥३॥ तत्पर तुझ्या या[12] जे ध्यानीं । अक्षय त्यांचे सदनीं । लक्ष्मी वास करी[13] दिनरजनीं । रक्षिसि संकट वारुनि[14] ॥ऐ०॥४॥ या[15] परिध्यान तुझें गुरुराया । दृश्य करीं नयनां या । पूर्णानंदसुखें ही काया । लाविसि हरिगुण गाया ॥ऐ०॥५॥

(९) श्रीसाईनाथमहिम्नस्तोत्रम्

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं, जगत्संभवस्थानसंहारहेतुम् ।

पाठभेद - १. कर २. या ३. या हो ४. अनुसयाअत्रिकुमारा ५. त्रिशूलडमरूधारी ६. चापअसुरारी ७. भक्ती ८. देशील ९. दंडमाला १०. शिरीं ११. वेष्टिला १२. हो १३. सदा १४. त्यजूनी १५. सुदर

स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयंतं, नमामीश्वरं सद्गुरुसाइनाथम् ।।१।। भवध्वांतविध्वंसमार्तंडमीड्यं, मनोवागतीतं मुनीर्ध्यानगम्यम् । जगद्व्यापकं निर्मलं निर्गुणं त्वां, नमामी०।।२।। भवांभोधिमग्नार्दितानां जनानां, स्वपादाश्रितानां स्वभक्तिप्रियाणाम् । समुद्धारणार्थं कलौ संभवंतं, नमामी०।।३।। सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात्सुधास्राविणं तिक्तमप्यप्रियं तम् । तरुं कल्पवृक्षाधिकं साधयंतं, नमामी०।।४।। सदा कल्पवृक्षस्य तस्याधिमूले भवद्भावबुद्ध्या सपर्यादिसेवाम् । नृणां कुर्वतां भुक्तिमुक्तिप्रदं तं, नमामी०।।५।। अनेकाश्रुतातर्क्यलीला-विलासैः, समाविष्कृतेशानभास्वत्प्रभावम् । अहंभावहीनं प्रसन्नात्मभावं, नमामी०।।६।। सतां:विश्रमाराममेवाभिरामं सदा सज्जनैः संस्तुतं सन्नमद्भिः । जनामोददं भक्तभद्रप्रदं तं, नमामी०।।७।। अजन्माद्यमेकं परं ब्रह्म साक्षात्स्वयं संभवं राममेवावतीर्णम् । भवद्दर्शनात्संपुनीतः प्रभोऽहं, नमामी०।।८।। श्रीसाईशकृपानिधेऽखिलनृणां सर्वार्थसिद्धिप्रद । युष्मत्पाद-रजःप्रभावमतुलं धातापि वक्ताऽक्षमः । सद्भक्त्या शरणं कृतांजलिपुटः संप्रापितोऽस्मि प्रभो, श्रीमत्साईपरेशपाद-कमलान्नान्यच्छरण्यं मम ।।९।। साईरूपधरराघवोत्तमं, भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम् । माययोपहतचित्तशुद्धये, चिंतयाम्यहमहर्निशं मुदा ।।१०।। शरत्सुधांशुप्रतिमप्रकाशं, कृपापात्रं तव साईनाथ । त्वदीयपादाब्जसमाश्रितानां स्वच्छायया तापमपाकरोतु ।।११।। उपासनादैवतासाइनाथ, स्तवैर्मयो -

पासनिना स्तुतस्त्वम । रमेन्मनो मे तव पादयुग्मे, भृङ्गो, यथाब्जे मकरंदलुब्धः ॥१२॥ अनेकजन्मार्जीतपापसंक्षयो, भवेद्भवत्पादसरोजदर्शनात् । क्षमस्व सर्वानपराधपूंजकान्प्रसीद साईश गुरो दयानिधे ॥१३॥ श्रीसाईनाथचरणामृतपूतचित्तास्तत्पादसेवनरताः सततं च भक्त्या । संसारजन्यदुरितौधविनिर्गतास्ते कैवल्यधाम परमं समवाप्नुवन्ति ॥१४॥ स्तोत्रमेतत्पठेद्भक्त्या यो नरस्तन्मनाः सदा । सद्गुरोः साईनाथस्य कृपापात्रं भवेद् ध्रुवम् ॥१५॥ साइनाथकृपास्वर्द्गसत्पद्यकुसुमावलिः । श्रेयसे च मनःशुध्यै प्रेमसूत्रेण गुंफिता ॥१६॥ गोविंदसूरिपुत्रेण काशीनाथाभिधायिना । उपासनीत्युपाख्येन श्रीसाईगुरवेऽर्पिता ॥१७॥ इति श्रीसाइनाथमहिम्नस्तोत्रं संपूर्णम् ॥

(१०) प्रार्थना

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विदितमविदितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे (श्रीप्रभो साईनाथ) ॥१॥

श्रीसच्चिदानंदसद्गुरु साईनाथ महाराज की जय

- माध्यान्ह आरतीचा कार्यक्रम समाप्त -

भाग ३ रा
धूप आरती
सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी

(१) आरती

आरती साईबाबा । सौख्यदातार जीवा । चरणरजातलीं । द्यावा दासां विसांवा, भक्तां विसांवा ।।आ.ध्रु.।। जाळुनियां अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षुजनां दावी । निज डोळां श्रीरंग ।।आ०।।१।। जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी ही माव ।।आ०।।२।। तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा ।।आ०।।३।। कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ।।द०।।आ०।।४।। आठां दिवसां गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया । भवभय निवारी ।।आ०।।५।। माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरजसेवा मागणें हेंचि आतां । तुम्हां देवाधिदेवा ।।आ०।।६।। इच्छित दीन चातक । निर्मल तोय निजसुख । पाजावें माधवा या । सांभाळ आपुली भाक ।।आ०।।७।।

(२) अभंग

शिरडी माझें पंढरपुर । साईबाबा रमावर ।।१।।
शुद्ध भक्ती चंद्रभागा । भाव पुंडलीक जागा ।।२।।
या हो या हो अवघे जन । करा बाबांसी वंदन ।।३।।
गणू म्हणे बाबा साई । धांव पाव माझे आई ।।४।।

(३) नमन

घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ।। प्रेमें आलिंगिन, आनंदें पूजिन, भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।। त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामि ।।३।। अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।

(४) नामस्मरण

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे (इति त्रिवार)

(५) नमस्काराष्टक

अनंता तुला तें कसें रे स्तवावें । अनंता तुला तें कसें रे नमावें ।। अनंता मुखांचा[1] शिणे[2] शेष गातां । नमस्कार साष्टांग श्रीसाइनाथा ।।१।। स्मरावें मनीं[3] त्वत्पदां नित्य भावें । उरावें तरी भक्तिसाठीं[4] स्वभावें ।। तरावें जगा[5] तारुनी मायताता । नमस्कार०।।२।। वसे जो सदा दावया संतलीला । दिसे अज्ञ

पाठभेद - १. मुखीचा २. शिणी ३. जनीं ४. कीर्तिरूपें ५. जगीं

लोकांपरी[1] जो जनांला ।। परी अंतरीं ज्ञान कैवल्यदाता । नमस्कार०।।३।। बरा लाधला जन्म हा मानवाचा । नरा सोर्थका[2] साधनीभूत साचा ।। धरूं साइप्रेमा गळाया अहंता । नमस्कार०।।४।। धरावें करीं सान अल्पज्ञ बाला । करावें अम्हां धन्य चुंबोनि गाला ।। मुखीं घाल प्रेमें खरा ग्रास आतां । नमस्कार०।।५।। सुरादीक ज्यांच्या पदा वंदिताती । शुकादीक ज्यांतें समानत्व देती ।। प्रेयागादि[3] तीर्थे पदीं नम्र होतां । नमस्कार०।।६।। तुझ्या ज्या[4] पदा पाहतां गोपबाली । सदा रंगली चित्स्वरूपीं मिळाली ।। करी रासक्रीडा सवें कृष्णनाथा । नमस्कार०।।७।। तुला मागतों मागणें एक द्यावें । करा[5] जोडितों दीन अत्यंत भावें ।। भवीं मोहनीराज हो[6] तारिं आतां । नमस्कार साष्टांग श्रीसाइनाथा ।।८।।

* (६) प्रार्थना

ऐसा येईं[7] बा । साई दिगंबरा । अक्षयरूप अवतारा । सर्वहि व्यापक तूं । श्रुतिसारा । अनुसयाऽत्रिकुमारा[8] ।।ध्रु०।। काशी स्नान जप, प्रतिदिवशीं । कोल्हापुर भिक्षेसी । निर्मल नदि तुंगा, जल प्राशी । निद्रा माहुर देशीं ।।ऐ०।।१।। झोळी लोंबतसे

पाठभेद - १. सदा जो निजेला २. सार्थक साधना तो फुकाचा ३. पदीं नम्रता ये प्रयागादीतीर्था ४. त्या ५. कर ६. या ७. या हो ८. अनुसयाअत्रिकुमारा * कडव्यांचा जुना क्रम २, ३, ४, ५

वाम करीं ।[४] त्रिशूल[१]-डमरू[२]-धारी । भक्तां[३] वरद सदा सुखकारी । देशील मुक्ती चारी ॥ऐ०॥२॥ पायीं पादुका[६] जपमाला[५] कमंडलू मृगछाला । धारण करिशी बा । नागजटा मुगुट शोभतो[७] माथां ॥ऐ०॥३॥ तत्पर[८] तुझ्या या जे ध्यानीं । अक्षय त्यांचे[९] सदनीं । लक्ष्मी[११] वास करी दिनरजनीं । रक्षिसि संकट वारुनि[१०] ॥ऐ॥४॥ या परिध्यान तुझें गुरुराया । दृश्य करीं नयनां या । पूर्णानंदसुखें ही काया । लाविसि हरिगुण गाया ॥ऐ०॥५॥

(७) श्रीसाईनाथमहिम्नस्तोत्रम्

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं, जगत्संभवस्थानसंहारहेतुम् । स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयंतं, नमामीश्वरं सद्गुरुसाइनाथम् ॥१॥ भवध्वांतविध्वंसमार्तंडमीड्यं, मनोवागतीतं मुनीर्ध्यानगम्यम् । जगद्व्यापकं निर्मलं निर्गुणं त्वां, नमामी० ॥२॥ भवांभोधि मग्नार्दितानां जनानां, स्वपादाश्रितानां स्वभक्तिप्रियाणाम् । समुद्धारणार्थं कलौ संभवंतं, नमामी० ॥३॥ सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात्सुधास्राविणं तिक्तमप्यप्रियं तम् । तरुं कल्पवृक्षाधिकं साधयंतं, नमामी० ॥४॥ सदा कल्पवृक्षस्य तस्याधिमूले भवद्भावबुद्ध्या सपर्यादिसेवाम् । नृणां कुर्वतां भुक्तिमुक्तिप्रदं तं, नमामी० ॥५॥ अनेकाश्रुतातर्क्यलीलाविलासैः, समाविष्कृतेशानभास्वत्प्रभावम् । अहंभावहीनं प्रसन्नात्मभावं,

---

पाठभेद - १. त्रिशूलडमरूधारी २. चापअसुरारी ३. भक्ती ४. देशील ५. दंडमाला ६. शिरीं ७. वेष्टिला ८. हो ९. सदा १०. त्यजुनी ११. सुंदर

नमामी० ।।६।। सतां:विश्रमाराममेवाभिरामं सदा सज्जनैः संस्तुतं सन्नमद्भिः । जनामोददं भक्तभद्रप्रदं तं, नमामी० ।।७।। अजन्माद्यमेकं परं ब्रह्म साक्षात्स्वयं संभवं राममेवावतीर्णम् । भवद्दर्शनात्संपुनीतः प्रभोऽहं, नमामी० ।।८।। श्रीसाईश कृपानिधेऽखिलनृणां सर्वार्थसिद्धिप्रद । युष्मत्पादरजःप्रभावमतुलं धातापि वक्ताऽक्षमः । सद्भक्त्या शरणं कृतांजलिपुटः संप्रापितोऽस्मि प्रभो, श्रीमत्साईपरेशपादकमलान्नान्यच्छरण्यं मम ।।९।। साईरूपधरराघवोत्तमं, भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम् । माययोपहतचित्तशुद्धये, चिंतयाम्यहमहर्निशं मुदा ।।१०।। शरत्सुधांशुप्रतिमप्रकाशं, कृपापत्रं तव साईनाथ । त्वदीयपादाब्जसमाश्रितानां स्वच्छायया तापमपाकरोतु ।।११।। उपासनादैवतसाइनाथ, स्तवैर्मयोपासनिना स्तुतस्त्वम । रमेन्मनो मे तव पादयुग्मे, भृङ्गो, यथाब्जे मकरंदलुब्धः ।।१२।। अनेकजन्मार्जीतपापसंक्षयो, भवेद्भवत्पादसरोजदर्शनात् । क्षमस्व सर्वानपराधपूंजकान्प्रसीद साईश गुरो दयानिधे ।।१३।। श्रीसाईनाथचरणामृतपूतचित्तास्तत्पादसेवनरताः सततं च भक्त्या । संसारजन्यदुरितौधविनिर्गतास्ते कैवल्यधाम परमं समवाप्नुवन्ति ।।१४।। स्तोत्रमेतत्पठेद्भक्त्या यो नरस्तन्मनाः सदा । सद्गुरोः साईनाथस्य कृपापात्रं भवेद् ध्रुवम् ।।१५।। साइनाथकृपास्वर्द्रुसत्पद्यकुसुमावलिः । श्रेयसे च मनःशुध्यै प्रेमसूत्रेण गुंफिता ।।१६।। गोविंदसूरिपुत्रेण काशीनाथाभिधायिना । उपासनीत्युपाख्येन श्रीसाईगुरवेऽर्पिता ।।१७।। इति श्रीसाइनाथमहिम्नस्तोत्रं संपूर्णम् ।।

(८) श्रीगुरुप्रसाद-याचना-दशक

रुसो मम प्रियांबिका[१], मजवरी पिताही रुसो ।
रुसो मम प्रियांगना[२], प्रियसुतात्मजाही[३] रुसो ।।
रुसो भगिनि बंधुही, श्वशुर सासुबाई रुसो ।
न दत्तगुरु साइ माँ[४], मजवरी कधींही रुसो ।।१।।

पुसो न सुनबाइ त्या, मज न भ्रातृजाया[५] पुसो ।
पुसो न प्रिय सोयरे, प्रिय सगे न ज्ञाती पुसो ।।
पुसो सुहृद[६] ना सखा[७], स्वजन नाप्तबंधू[८] पुसो ।
परी न गुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ।।२।।

पुसो न अबला[९] मुलें, तरुण वृद्धही ना पुसो ।
पुसो न गुरु[१०] धाकुटें, मज न थोर साने[११] पुसो ।।
पुसो नच भलेबुरे, सुजन साधुही ना पुसो ।
परी न गुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ।।३।।

रुसो चतुर तत्त्ववित्[१२], विबुध प्राज्ञ[१३] ज्ञानी रुसो ।
रुसोहि विदुषी[१४] स्त्रिया, कुशल पंडिताही रुसो ।।

पाठभेद - १. आई, माता २. स्त्री, बायको, पत्नी ३. सुत = मुलगा, आत्मजा = मुलगी ४. आई ५. भावजय ६. निष्काम मित्र ७. सकाम मित्र ८. आप्त = नातेवाईक ९. स्त्रिया १०. वडील ११. लहान १२. वेदांती १३. शहाणे १४. (अज्ञानी) विद्वान्

रुसो [१]महिपती [२]यती, [३]भजक तापसीही रुसो ।
न दत्तगुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ॥४॥

रुसो कवि ऋषी मुनी, [४]अनघ सिद्ध योगी रुसो ।
रुसो हि गृहदेवता, [५]नि कुलग्रामदेवी रुसो ॥
रुसो [६]खल [७]पिशाच्चही, [८]मलिन [९]डाकिनीही रुसो ।
न दत्तगुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ॥५॥

रुसो [१०]मृग [११]खग [१२]कृमी, अखिल जीवजंतू रुसो ।
रुसो [१३]विटप [१४]प्रस्तरा, [१५]अचल [१६]आपगा[१७]ब्धी रुसो ॥
रुसो [१८]ख [१९]पवना[२०]ग्नि [२१]वार, [२२]अवनि पंचतत्त्वें रुसो ।
न दत्तगुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ॥६॥

रुसो [२३]विमल [२४]किन्नरा, [२५]अमल [२६]यक्षिणीही रुसो ।
रुसो [२७]शशि [२८]खगादिही, [२९]गगनिं [३०]तारकाही रुसो ॥

पाठभेद - १. राजा २. संन्यासी ३. भक्त ४. निष्पाप ५. आणि, व ६. दुष्ट ७. भूत ८. पापी ९. विवशी १०. पशु ११. पक्षी १२. कीटक १३. झाड १४. दगड १५. पर्वत, डोंगर १६. आपगा = नदी १७. अब्धि = समुद्र १८. आकाश १९. वायू २०. अग्नि = तेज २१. अप् = पाणी २२. पृथ्वी २३. शुद्ध २४. यक्ष २५. निर्मल २६. अंतरिक्षनिवासी जनांच्या स्त्रिया २७. चंद्र २८. खग = सूर्य आदि नवग्रह २९. आकाशात ३०. नक्षत्रें

रुसो अमरराजही[1], अदय[2] धर्मराजा[3] रुसो ।
न दत्तगुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ।।७।।

रुसो मन सरस्वती[4], चपलचित्त तेंही रुसो ।
रुसो वपु[5] दिशाखिला[6], कठिण काल[7] तोही रुसो ।।
रुसो सकल विश्वही, मयि[8] तु ब्रह्मगोलं[9] रुसो ।
न दत्तगुरु साइ मा, मजवरी कधींही रुसो ।।८।।

विमूढ[10] म्हणुनी हंसो, मज न मत्सराही[11] डसो ।
पदाभिरुचि[12] उल्हसो[13], जननकर्दमीं[14] ना फसो ।।
न दुर्ग[15] धृतिचा[16] धसो[17], अशिवभाव[18] मागें खसो ।
प्रपंचि मन हें रुसो, दृढ विरक्ति चित्तीं ठसो ।।९।।

कुणाचिहि घृणा[19] नसो, न च स्पृहा[20] कशाची असो ।
सदैव हृदयीं वसो, मनसि ध्यानिं साई वसो ।।
पदीं प्रणय वोरसो, निखिल दृश्य बाबा दिसो ।
न दत्तगुरु साइ मा, उपरि याचनेला रुसो ।।१०।।

पाठभेद - १. इंद्र २. निर्दय ३. यम ४. वाचा ५. शरीर ६. दिशा-अखिल = सर्व दिशा ७. सर्वव्यापक काल ८. माझ्या ठिकाणी ९. त्रिभुवन १०. मूर्ख ११. मत्सर-अहि = हेवा, परोत्कर्षद्वेषरूपी सर्प १२. गुरुपदाची आवड १३. आनंद पावो १४. जन्मरूपी चिखलात १५. किल्ला १६. धैर्याचा १७. ढासळो १८. अकल्याण - कल्पना १९. द्वेष २०. इच्छा

(९) पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्या संति देवाः ।। ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कूर्महे । स मे कामान्कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो दधातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

(१०) प्रार्थना

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विदितमविदितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे (श्रीप्रभो साईनाथ) ।।१।।

श्रीसच्चिदानंदसद्गुरु साईनाथ महाराज की जय

- धूपारतीचा कार्यक्रम संपूर्ण -

भाग ४ था

शेजारती

रात्री १० वाजता

(१) आरती

ओंवाळूं आरती माझ्या सद्‌गुरूनाथा, साईनाथा ।।
पांचांही तत्त्वांचा दीप लाविला आतां ।।
निर्गुणाची स्थिति कैसी आकारा आली ।।
सर्वां घटीं भरूनि उरली साई माउली ।।ओंवाळूं०।।
रज तम सत्त्व तिघे माया प्रसवली ।।
मायेचिये पोटीं कैसी माया उद्भवली ।।ओंवाळूं०।।
सप्तसागरीं कैसा खेळ मांडीला ।।
खेळूनियां खेळ अवघा विस्तार केला ।।ओंवाळूं०।।
ब्रह्मांडींची रचना दाखविली डोळां ।।
तुका म्हणे माझा स्वामी कृपाळू भोळा ।।
सद्गुरु (साई सद्गुरु) भोळा ।।ओंवाळूं०।।

(२) आरती ज्ञानरायाची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।।ध्रु०।।
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।

अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥१॥
कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरहो । सामगायन करी ॥२॥
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
राम जनार्दनीं । पायीं मस्तक ठेविलें ।

(३) आरती तुकारामाची

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरूधामा ।
सच्चिदानंद मूर्ती । पाय दाखवीं आम्हां ॥ध्रु०॥
राघवें सागरांत । जैसे पाषाण तारिलें ।
तैसे हे तुकोबाचे । अभंग (उदकीं) रक्षिलें ॥१॥
तुकितां तुलनेसी । ब्रह्म तुकासी आलें ।
म्हणोनी रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥२॥

(४) शेजारती

(उदो बोला उदो अंबा० या चालीवर)

जय जय साईनाथ आतां पहुडावें मंदिरीं हो । आळवितों सप्रेमें तुजला आरति घेउनि करीं हो ॥जय०॥ध्रु०॥ रंजविसी तूं मधुर बोलुनि माय जशी निज मुला हो । भोगिसि व्याधी तूंच हरुनियां निजसेवकदु:खाला हो ॥ धांवुनि भक्तव्यसन हरिसी दर्शन देसी त्याला हो । झाले असतील कष्ट अतिशय तुमचे

या देहाला हो ।।जय०।।१।। क्षमा शयन सुंदर ही शोभा सुमनशेज त्यावरी हो । घ्यावी थोडी भक्तजनांची पूजनादि चाकरी हो ।। ओंवाळितों पंचप्राण, ज्योति सुमती करीं हो । सेवा किंकर भक्त प्रीती अत्तर परिमळ वारी हो ।।जय०।।२।। सोडुनि जाया दुःख वाटतें साई त्वच्चरणांसी हो । आज्ञेस्तव तव आशीप्रसाद घेउनि निजसदनासी हो ।। जातों आतां येऊं पुनरपि त्वच्चरणाचे पाशीं हो । उठवू तुजला साइमाउले निजहित साधायासी हो ।।जय०।।३।।

(५) शेजारती

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता । करा साइनाथा ।। चिन्मय हें सुखधामा जाउनि देवा पहुडा एकांता ।।ध्रु०।। वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला । बाबा चौक झाडीला ।। तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला ।।आतां०।।१।। पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती । बाबा नवविधा भक्ती ।। ज्ञानाच्या समया लावुनि उजळल्या ज्योती ।।आतां०।।२।। भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगिला । बाबाकाशीं टांगिला ।। मनाचीं सुमनें करुनि केलें शेजेला ।।आतां०।।३।। द्वैताचें कपाट लावुनि एकत्र केलें । बाबा एकत्र केलें ।। दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनि पडदे सोडिले ।।आतां०।।४।। आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि गलबला । बाबा सांडुनि गलबला ।। दया क्षमा शांति

दासी उभ्या सेवेला ॥आतां०॥५॥ अलक्ष्य उन्मनी घेउनी बाबा नाजुक दु:शाला[1] । बाबा नाजुक दु:शाला ॥ निरंजन सद्गुरु स्वामी निजविले शेजेला ॥आतां०॥६॥

प्रसाद मिळण्याकरितां

(६) अभंग

पाहें प्रसादाची वाट । द्यावें धुवोनियां ताट ॥१॥
शेष घेउनी जाईन । तुमचें झालिया भोजन ॥२॥
झालों आतां एकसवा । तुम्हा आळंवावो देवा ॥३॥
तुका म्हणे आतां चित्त । करूनी राहिलों निश्चित ॥४॥

प्रसाद मिळाल्यावर

(७) पद

पावला प्रसाद आतां विठो निजावें । आपुला तो श्रम कळों येतसे भावें ॥१॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुले स्थळा ॥२॥ तुम्हांसी जागवूं आम्ही आपुल्या चाडा । शुभाशुभ कर्मे दोष हरावया

पाठभेद - १. दुशेला

पीडा ॥३॥ तुका म्हणे दिधलें उच्छिष्टाचें भोजन । नाहीं निवडिलें आम्हां आपुल्या भिन्न ॥४॥

(८) अभंग

साइनाथ महाराज । आतां कृपा करा गुरुराज ॥ध्रु०॥
त्रिविधताप हा पाठिं लागला । कांहीं न सुचे काज ॥आ०॥१॥
मनोवृत्ति ह्या कितीतरी उसळती । उतरीं यांचा माज ॥आ०॥२॥
हरिसी जैसा दीन जनाचें । व्यसन कसुनी माज ॥आ०॥३॥
कृष्णदास त्वच्चरणीं झाला । लीन त्यजुनि जनलाज ॥आ०॥४॥

- शेजारतीचा कार्यक्रम संपूर्ण -

प्रत्येक आरतीच्या शेवटी भालदार चोपदार यांच्याकडून खालील बिरुदावली (ललकारी) म्हटली जाते.

"ॐ राजाधिराज योगिराज परब्रह्म श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज"

श्रीसाईनाथांच्या रथाच्या, पालखीच्या मिरवणुकीच्या वेळी उपयोगात आणली जाणारी व भजनाच्या वेळी म्हटली जाणारी पदे व भजने

(१) मनास बोध

पद

(नको हरी मज सोडुनि० या चालीवर)

क्या किया मन शिरडी आकर साईंनाथ प्रभु चीन्हा रे ? ।।ध्रु०।। देस देस घुम शिरडी आया साईं दर्शन लिया रे । खाया पिया सुख से सोया विचार ना कछु किया रे ।।क्या०।।१।। औट हाट पीठ मंदिर सुंदर ठाट बाट सब देखा रे । ज्ञाननयन से साईंनाथ ह्न्मंदिर को ना निरखा रे ।।क्या०।।२।। भात भात के फल-मेवा अरु शक्कर दिल भर खाया रे । ज्यों न तूनें श्रीसाइनाथ मुखस्वप्रेमवचनरस चाखा रे ।।क्या०।।३।। ठाट बाट से पूजन कर धन मांगा उतना दिया रे । ना देके सप्रेम भाव को फिर पीछे पछताया रे ।।क्या०।।४।। दिन भर्रा खुब सेवा कीन्हीं औट पीठ लपटाया रे । औट पीठ धनि लपटन खांतिर काम कोप न

खोया रे ।।क्या०।।५।। साईं न हिंदू यवन जब माना मुखचरणोदक पाया रे । पाछे के अवतार चरित का खोजा दिल बिच पाया रे ।।क्या०।।६।। धनदौलत अरु मंदिर माडी छांड जोग जद लिया रे । तनक तनक वे काम काम से रूठ जोग बल खोया रे ।।क्या०।।७।। साइनाथ मा तात गुसांई जान मान सब तजना रे । वो ही राम अरु कृष्ण भरा है सब घट घट ना जाना रे ।।क्या०।।८।।

श्रीभीष्मकृत श्रीसाईनाथचिंतन

मनोहरमाला

(२) अभंग

मनोहर ध्यान किती हें साईचें । पाठीशीं चांदीचें सिंहासन ।।
सिंहासन गादी उशांचे सहित । सछत्र शोभत प्रभावळी ।।
प्रभावळीमाजी कुंजवनशोभा । शोभेचा हा गाभा मुरलीधर ।।
मुरली धरिली सुंदर हो हातीं । वाजवूनियां ती धेनू पाळी ।।
पाळीव पक्ष्याचे समान मयूर । करिती विहार वनामध्यें ।।
वनामध्यें हरी नित्य हा क्रीडत । रवि स्थिरावत आनंदानें ।।
आनंदानें दोघे गरुड हनुमंत । जोडोनियां हात उभे सेवे ।।
सेवेकरी मोदें मोर्चेल चवरी । धरिती स्वामीवरी प्रेमभावें ।।
भावें धावूनियां येती भक्तजन । करिती पूजन एकनिष्ठें ।।

एकनिष्ठ मेघा[१] करितां आरती । स्वामी खुणवीती आत्मबोध ।।
बोध करूनियां भक्तावरी दृष्टी । करिताती वृष्टी सुप्रेमाची ।।
सुप्रेमाची मना आवडी लागली । म्हणूनी गुंफली भावें माला ।।
माला ही गुरूची गुरूला वाहिली । पावन ती झाली गुरूचे पायीं ।।
पायीक या माना कृष्णा साईनाथा । जडो पद माथा मनोहर ।।१।।

(३) मानसपूजा

शा.वि. - श्रीमत्साइ परेश मूर्ति ह्रदयीं आणोनियां पाहिली ।
तों ती सुंदर वस्त्रवेष्टित शिरीं भासावया लागली ।।
पाहें जों निरखोनि अंगि कफनी सिंहासनाचे पुढें ।
बैसे आसन घालुनि सकलही ने जो लया सांकडें ।।१।।

व.ति. - आपाद मस्तक निहाळुनियां गुरूला ।
भावें पदीं नमुनि मस्तक ठेवियेला ।।
ठेवियला वरदहस्त शिरीं गुरूनें ।
केलें पुढें स्वमनिं पूजन तत्कृपेनें ।।२।।

मालि. - प्रथम गुरुपदांघ्रीं अर्पिलें प्रेमवारी ।
त्रिभुवनपथगामी पाप ज्याचेनि वारी ।।

पाठभेद - १. मेघा हा अति कृपाळू व एकनिष्ठ सद्भक्त मिती पौष वद्य अमावास्या रोजी शुक्रवारी पहाटेस चार वाजता कैलासवासी झाला.

ग्रहण करुनियां तत्प्रेमतीर्थोदकातें ।
पुनित करूनि देहा पूजिलें सद्गुरूतें ॥३॥

शा.वि. - भावें केशरयुक्त चंदन मनें पादांगुलीं लाविलें ।
पुष्पें सुंदर अक्षता तुलसिही वाहोनियां अर्चिलें ॥
केलें वंदन पादमार्जन शिरीं पुष्पें सुगंधीजलें ।
भालीं लावुनि गंध पुष्प तुलसी बिल्वाक्षतें पूजिलें ॥४॥

इं.व. - कर्णासि कंठासि उर:स्थळाला ।
लावूनियां चंदन दो करांला ॥
पुष्पाक्षता वाहुनि पुष्पमाला ।
गुंफोनियां अर्पिलि सद्गुरूला ॥५॥

देवाचिया हस्ति सुगंधिपुष्प ।
अर्पियले नंतर धूप दीप ॥
काल्पी करीं देउनियां गुरूला ।
दक्षणा विडा नंतर अर्पियेला ॥६॥

शिख. - करोनियां ऐसें यजन मग मीं दीप धरुनी ।
तुला ओंवाळुनि मुखकमल तें नेत्र भरुनीं ॥
पहातां तूं केली मजवरि कृपावृष्टि नयनीं ।
अहाहा त्या सौख्या किति वदुं गुरू अल्पवदनीं ॥७॥

शा.वि. - गादी पाट उशा समस्त उचला साई असें सांगुनि ।
काढिती खिचडी शिरा सकळ जें भक्तें दिलें आणुनि ॥
वांटोनि सगळें यथोचित पुढें देती प्रसादीं उदी ।
ती मीं घेउनि हस्ति भाल नमुनि ठेवियला तत्पदीं ॥८॥

घेवोनि उदी दूर राहुनि उभा जैं सद्‌गुरू पाहिला ।
तेव्हां जोडुनि श्रीहरी समपदें वाटे उभा राहिला ॥
होवोनि अति सुप्रसन्न नयनीं सुप्रेमवृष्टि करी ।
दे जी सद्‌गुरु साइनाथ उदि ती आशीच भक्तावरी ॥९॥

शिख. - प्रभो साईनाथा ग्रथित कवनीं मानसपुजा ।
करूनि केला ह्या गरिब अपुला दास समजा ॥
सदा गाऊनी ही करिति गुरुची मानसपुजा ।
तया कृष्णस्वामी वरदत्रिदिवेशास्तरुजवा ॥१०॥

॥ इति श्रीसाईनाथचिंतन समाप्त ॥

(भजनें)

(१) सांईनाथ गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं ।।

(२) दत्तराज गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं ।।

(३) सद्‌गुरुनाथ सांईनाथ, मी अपराधी घ्या पदरांत ।।

(४) भक्तांची माउली, सांईनाथ ।।

(५) धांवा सांईनाथ सांई प्रभो भक्तवत्सला ।
भक्तास्तव होत तुम्ही कृष्णसावळा ।।

(६) अंवती भंवती गोपालांची दाटी ।
खेळ खेळे जगजेठी वाळवंटी ।।

(७) सद्‌गुरुनाथ सांईनाथ बाबा शिरडीला ।
चला जाऊं पाहूं गावूं त्यांच्या लीला ।।

(८) सांईच्या कीर्तीचा वाजे डिंडिम हा ।
ऐकूं येई नांव त्यांचे नांव जगती पहा ।।

(९) वंदु या विनयें सांईच्या मूर्तीला ।
म्हणूं गावूं प्रेमें सदा त्यांच्या आरतीला ।।

(१०) सांई बोल सांई बोल, सांई सांई बोल ।
शिरडी शंकर विठ्ठल बोल ।।

(११) मार्गीं हळू हळू चाला । मुखानें सांईनाथ बोला ।।

(१२) सांईनाथ दया करीं । योगमाया आवरीं ।।

(१३) सांईनाथ सांईनाथ भज रे मना ।
असा नरजन्म येई ना पुन्हां ।।

(१४) सांई माझा ज्ञानेश्वर । महाविष्णूचा अवतार ।।

(१५) गगनांत तारका, शिरडींत द्वारका ।
साईसारखा, देव नाहीं, देव नाहीं ।।

(१६) तुमको लाख्खो प्रणाम ।।ध्रु०।।
शिरडी रहने वाले तुमको ।
साई कहलाने वाले तुमको ।
गोदातीरनिवासी तुमको ।
भक्तों के दुखहारी तुमको ।
भक्तों के सुखकारी तुमको ।।ध्रु०।।१।।
शंकर जी का रूप ही तुम हो ।
गणेश जी का रूप ही तुम हो ।
विठ्ठल जी का रूप ही तुम हो ।
त्रैमूर्ती का रूप ही तुम हो ।
नारायण का रूप ही तुम हो ।
रामचंद्र का रूप ही तुम हो ।।ध्रु०।।२।।
मेरा शिर तुम चरणों पर ही ।
रहे सदा ही मेरी बिनती ।
खास सुनोंगे आशा मेरी ।
बिनति करुं हूं सांई सांई ।।ध्रु०।।३।।

(भजन)

माउली गुरु माउली

माउली गुरु माउली ।।
करी कृपेची साउली ।।ध्रु०।।
मुखें म्हणा बिरुदावली ।
आप्त पिता बंधू तूं आई ।
आलों शरण तुला वनमाळी
(बघ साई) ।।१।।ध्रु०।।

पावलासि तूं दासगणूंना ।
काका बापू श्यामाण्णांना ।।
तसाच देवांच्या बाळांना ।
धांवत येई शिरडी सांई ।।२।।ध्रु०।।

जय जय रघुवीर समर्थ

(श्लोक)

अहिल्या शिळा राघवें मुक्त केली ।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।।
जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।।१।।

ज्या ज्या स्थळीं हें मन जाय माझें ।
त्या त्या स्थळीं हे गुरुरूप तुझें ॥
मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणीं ।
तेथें तुझे सद्गुरु पाय दोन्हीं ॥२॥

॥ साईनाथ गुरु माझे आई ॥ मजला ठाव द्यावा पायीं ॥

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥१॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥२॥
नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥३॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥४॥

- समाप्त -

श्रीरामनवमी — उत्सव

चैत्र शु. ८, ९ व १०

श्री गुरुपौर्णिमा — उत्सव

आषाढ शु. १४, १५ व कृ. १

श्रीसाईमहाराजांची पुण्यतिथी

विजयादशमी

श्रीपुण्यतिथी — उत्सव

आश्विन शु. नवमी, दशमी व एकादशी

(पारण्याच्या दिवशी एकादशी आल्यास काला द्वादशीस होईल.)

दर उत्सवाच्या दिवशी समाधि-मंदिर हे रात्रभर खुले ठेवण्यात येते व त्यावेळी सर्व कलाकारांची हजेरी समाधीपुढे स्वीकारली जाते.

गलेफाचे माप



सर्व साईभक्तांना नम्र विनंती करण्यात येते की, त्यांनी गलेफ वरील मापांतच पाठविल्यास बाबांच्या समाधीस बरोबर होईल व केलेल्या खर्चाचे त्यांना समाधान होईल. भक्तांनी समाधीवर घालण्यासाठी आणलेला गलेफ संस्थानच्या कार्यालयात सकाळी नोंद करून घेणे. गलेफाऐवजी त्या मापांची चादर, शाल अगर इतर वस्त्रही चालेल.

ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :-

(१) **श्री साईबाबा संस्थान**, पो. शिर्डी, ता. रहाता,
जि. अहमदनगर - ४२३१०९.
दूरध्वनी क्र. : ०२४२३-५५२२५, ५५२२६, ५५१७५
फॅक्स : ०२४२३ - ५५२११
*ई-मेल : saibaba@pn3.vsnl.net.in
*URL : http://www.shrisaibabasansthan.org

(२) **मुंबई कार्यालय : साईनिकेतन**, ८०४ बी,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी क्र. : ०२२ - ४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : ०२२-४१५०७९८
*ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in

सूचना : व्ही.पी.पी. पद्धत नाही. ग्रंथाची किंमत व पोस्टेज वेगळे पडेल.